वर्ष-०८ | अंक-३९ | मुंबई, मंगळवार १६ ते २२ ऑगस्ट - २०२२ | पृष्ठ-४

पोलीस बातमी पत्र

पोलीस बातमी पत्र

ठाणे आवृत्ती

मराठी साप्ताहिक

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

POSTAL REGISTRATION No.PLG/205/2022-2024

You Tube

• संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

PG 2 रेल्वेत चोरी करणाऱ्या टोळीला पोलिसांनी घातल्या बेड्या, दोन महिलाही ताब्यात

3 → युनियन बँकेत तारण ठेवलेले दागिने निघाले नकली

अ‍ॅमेझॉन कंपनीची कोट्यवधींनी फसवणूक, बनावट आयडीद्वारे सायबर गुन्हेगारांनी लावला चुना ← 4

www.policebatmipatra.com / policebatmipatra.in policebatmipatra@gmail.com FOLLOW US! https://policebatmipatra.page

# 3 वर्ष, 714 अपघात, 246 मृत्यू, 387 जायबंदी!

## मुंबई-पुणे एक्स्प्रेस हायवेवरील अपघातांची भीषण आकडेवारी



मुंबई : मुंबई पुणे एक्स्प्रेस हायवेवर रविवारी रविवारी विनायक मेटे यांचं भीषण अपघात झाला. वयाच्या 52व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला या अपघातातील विनायक मेटे यांच्या मृत्यूमुळे सगळयांनाच मोठा धक्का बसला. खोपोली जवळ झालेल्या या अपघातामुळे मुंबई पुणे एक्स्प्रेस हायवेवरील अपघातांची गेल्या तीन वर्षांची आकडेवारीच आता समोर आली आहे. हा आकडेवारी अत्यंत चिंताजनक असून शेकडो प्रवाशांनी मुंबई पुणे एक्स्प्रेस हायवेवर कार अपघातात आपला जीव गमावला आहे. तर कित्येक जण जायबंदी झालेत. तीन वर्षांत सातशेपेक्षा जास्त अपघात, दोनशेपेक्षा जास्त बळी आणि तीनशेपेक्षा जास्त जण गंभीररीत्या जखमी झालेत. 2019 ते 2021 या तीन वर्षांच्या काळातील अपघातांची भीषण आकडेवारी समोर आल्यानंतर मुंबई पुणे एक्स्प्रेस वे हा मृत्यूचा सापळा असल्याचं अधोरेखित झालंय.

भीषण!

2019 ते 2021 या तीन वर्षांत एकूण 714 अपघात झाले. या अपघातांपैकी 207 अपघात हे अत्यंत भीषण होते. या अपघातांत एकूण 246 जणांनी जीव गमावला. तर 386 जण गंभीर जखणी झाले. दरम्यान, गेल्या वर्षभरात म्हणजेच 2021 मध्ये 71 गंभीर अपघात झाले असून त्यात 77 जणांचा मृत्यू झाला असल्याचीही आकडेवारी समोर आलीय.

**का होतायत अपघात?**

मुंबई पुणे एक्स्प्रेस हायवेवरील अपघातांची वाढती संख्या चिंतेचा विषय ठरतेय. गेल्या तीन वर्षांत झालेल्या सातशेहून अधिक अपघातात 62 जण किरकोळ जखमी झालेत. तर 387 जणांना गंभीर मार बसून त्यांचं आयुष्य उद्‌ध्वस्त झालंय. भरधाव वेगानं बेदरकारपणे वाहन चालवणं, टायर फुटणं, लेन कटिंग, ओव्हरटेंगिक यामुळे मुंबई पुणे एक्स्प्रेस हायवेवर वारंवार अपघाताच्या घटना घडत असल्याचं समोर आलंय. आतापर्यंत झालेल्या अपघाताच्या वेळा पाहिल्यास, सर्वाधिक अपघात हे रात्रीच्या वेळी आणि पहाटेच्या सुमारास झाल्याचीही माहिती पोलिसांनी दिली आहे.

**चिंताजनक आकडेवारी**

दरम्यान, 2021 साली राज्यात एकूण 12 हजार 553 भीषण अपघात झाले. त्यात 13 हजार 528 जणांनी जीव गमावला तर 10 हजार 877 जण गंभीर जखमी झाले.

यात राष्ट्रीय महामार्गावर झालेल्या अपघातात 3992 तर राज्य महामार्गावर झालेल्या अपघातात 3411 जणांनी प्राण गमावलाय. तर इतर मार्गावर जीव गमावलेल्यांचा आकडा हा 5724 इतका आहे.

## प्रवासादरम्यान महिलांच्या पर्सवर डल्ला मारणारा सराईत चोरटा गजाआड

### तब्बल 21 लाखाचा माल जप्त



कल्याण : मेल एक्सप्रेसमध्ये प्रवास करणाऱ्या महिलांच्या पर्समधून पैसे आणि दागिने चोरणाऱ्या एका सराईत चोरट्याला कल्याण रेल्वे क्राईम ब्रान्च पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. शहजाद सय्यद असे या चोरट्याचे नाव आहे. त्याच्याकडून आतापर्यंत 13 गुन्ह्यांची उकल करण्यात आली असून तब्बल 21 लाख 68 हजार किंमतीच्या 417 ग्राम सोन्याच्या 13 लगडी हस्तगत करण्यात आल्या आहेत . काही दिवसापासून कल्याणहून कसारा आणि कजर्तच्या दिशेने जाणाऱ्या मेल एक्सप्रेसमध्ये चोरीच्या घटना वाढल्या होत्या. विशेष म्हणजे मेल एक्सप्रेसगाडयांमध्ये महिलांच्या पर्स चोरीच्या घटना दास्त घडत होत्या. महिला प्रवाशांच्या पर्समध्ये हात टाकून चोरटा मोठ्या शिताफीने ...पान २ वर...

# इंस्टाग्रामवर मैत्रीनंतर तरुणीचे अश्लील फोटो व्हायरल करण्याची धमकी



ठाणे तरुणीशी इंस्टाग्रामवर मैत्री करून तिचे अश्लील फोटो सोशल मीडियावर व्हायरल करण्याची धमकी देणाऱ्या एका आरोपीला विष्णूनगर पोलिसांनी तांत्रिक पद्धतीचा अवलंब करून राजस्थानातून अटक केली. सोहेल सलामदद्दीन खान वय 18 वर्षे असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. आरोपी राजस्थानच्या चुरू जिल्ह्यातल्या तारानगरमध्ये राहणारा आहे.

धमकीने तरुणी भयभीत पिडीत तरुणी डोंबिवलीत कुटूंबासह राहते. आरोपी सोहेल खान याने इंस्टाग्रामवर काही महिन्यांपूर्वी पीडित तरुणीशी मैत्री केली होती. त्यानंतर मैत्रीचा फायदा घेऊन आरोपीने या तरुणीला व्हिडीओ कॉल केले. आरोपीने तरुणीच्या अश्लील फोटोंचे स्क्रीनशॉट काढले आणि माझ्याशी बोलली नाहीस तर हेच अश्लील फोटो सोशल मीडियावर प्रसारित करेन अशी धमकी दिली. या धमकीने भयभीत झालेल्या तरुणीने हा प्रकार घरच्यांना सांगितला. अखेर घरच्यांच्या मदतीने तरुणीने दिलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी भादंवि कलम 354 (ड) आयटी ॲक्ट 67 (अ) सह पोक्सो कायद्याचे कलम 8, 12 अन्वये गुन्हा दाखल केला.

मोबाईल लोकेशनमुळे आरोपी पोलिसांच्या तावडीत वरिष्ठ पोलिस निरीक्षक पंढरीनाथ भालेराव यांच्या मार्गदर्शनाखाली शांताराम नागरे, किरण नलावडे आणि दिलीप पवार यांनी आरोपीच्या मोबाईल नंबरच्या माध्यमातून माहिती काढली. त्यानंतर या पोलिसांनी राजस्थानमध्ये जाऊन सोहेल खान याला बेड्या ठोकल्या. कल्याण कोर्टाने त्याला अधिक चौकशीकरिता पोलिस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत.

# दरोडेखोर पुढे पोलीस मागे..,अर्धा तास पाठलाग; 15 ऑगस्टच्या मध्यरात्रीचा थरार



पैठण तालुक्यातील राहटगाव येथे काही दरोडेखोरांनी दगडफेक करून ट्रक चालकांना लुटण्याचा प्रयत्न केल्याची माहिती मिळताच पैठण पोलिसांनी त्या दिशेने धाव घेतली. मात्र चोरच खुद्द पैठण शहराच्या दिशेन आले आणि सुरु झाला चोर पोलिसांचा खेळ. पुढे दरोडखोरांची गाडी आणि मागून पोलिसांची एक चारचाकी-दुचाकीने पाठलाग सुरु झाला. 15 ऑगस्च्या मध्यरात्री सुरु झालेला हा थरार तब्बल अर्धा तास चालला. मात्र पैठण पोलिसांनी दरोडेखोरांच्या गाडीला घेरावा घालत अखेर त्यांना ताब्यात घेतले. सोमनाथ दादासाहेब नरवडे (वय 20 वर्ष, रा. घोटण, ता. शेवगाव, जि. अहमदनगर) आणि स्वप्नील मारोती दराडे (वय 19 वर्ष, रा. पागोरी पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर) असे आरोपींचे नावं आहेत. याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पोलीस स्टेशन पैठण हद्दीमध्ये रात्रीच्या साडेबारा वाजेच्या सुमारास कर्नाटक राज्यातुन कोपरगाव व नाशिक येथे माल वाहतुक करणारा ट्रकला एका बोलेरो वाहनातील दोन इसमांनी रहाटगाव फाटा येथे अडवले. ट्रक चालक व वाहकाला तलवारीचा धाक दाखवुन त्यांना चापटबुक्क्याने लाथाने मारहाण करुन त्यांच्याकडील 1400 रुपये बळजबरीने काढुन घेतले. या घटनेची माहिती मिळताच रात्रगस्तीवर असलेले पोलीस निरीक्षक किशोर पवार व त्यांचा स्टाफ घटनास्थळाकडे रवाना झाला. मात्र त्याचवेळी आरोपी सुद्धा पैठणकडे येत असल्याची माहिती पवार यांना मिळाली.

**पुढे दरोडेखोर मागे पोलीस...**

ट्रक चालकांना लुटणारे पैठणकडे येत असल्याची माहिती मिळताच पवार यांनी आरोपींना पकडण्यासाठी प्रयत्न केला. मात्र पोलिसांना पाहून आरोपींनी गाडी पैठण शहाराकडे वळवली. मग पुढे दरोडेखोर मागे पोलीस असा खेळ सुरु झाला. याचवेळी शहरात दुचाकीवरून पेट्रोलिंग करत असलेल्या पोलिसांकडून सुद्धा आरोपींच्या गाडीचा पाठलाग सुरु झाला. त्यांनतर अर्ध्या तासांनी पोलिसांनी आरोपींना अखेर अडवून ताब्यात घेतले.

# कामातून घरबसल्या पैसे कमावा' जाहिरातीला बळी पडून बोरीवलीतील गृहिणीने गमावले लाखो रुपये!




मुंबई : महिलांना नोकरीच्या आमीषातून लाखो रुपयांचा गंडा घालण्यात आला आहे. याप्रकरणी बोरीवली पोलीस स्ठानकात तक्रार देण्यात आली असून सायबर भामट्यांनी या महिलांकडून लाखो रुपये उकळलेत. तब्बल 8 लाख 60 हजार रुपयांचं गंडा या महिलांना घालण्यात आल्यामुळे खळबळ उडाली आहे. त्यामुळे कोणत्याही लिंकवर क्लिक करताना शंभर वेळा विचार करा, असं सांगण्याची वेळ पुन्हा एकदा आलीय. चाळीस वर्षांची बोरीवलीतील गृहिणी कामाच्या शोधात होती. तिने गुगलवर नोकरीसाठी शोध घेतला. ऑनलाईन रिचार्ज स्कीमच्या माध्यमातून पैसे कमावण्याच्या प्रकाराला या महिला बळी पडल्या आणि लाखो रुपये गमावून बसल्या. त्यामुळे ऑनलाईन कामातून घरच्या घरी पैसे कमावण्याच्या जाहिरातींना भुलून जर तुम्हीही असं काम करत असाल, तर त्या कामाची सत्यता पडताळणं आणि खबरदारी बाळगणं गरजेचं आहे, हे या घटनेनं अधोरेखित केलंय.


**कमिशनच्या नावाखाली फसवणूक**

12 ऑगस्ट रोजी बोरीवली पोलिसांना याप्रकरणी तक्रार नोंदवण्यात आली होती. एका गृहिणीने दिलेल्या तक्रारीनुसार, ही महिला गुगलवर नोकरीचा शोध घेत होती. त्यावेळी समोर आलेल्या एका लिंकवर तिने क्लिक केलं. यानंतर या महिलेला टेलिग्रामवर मेसेज यायला सुरुवात झाली. एका वेबसाईटवर या महिलेला रजिस्टर करण्यास सांगण्यात आलं होतं. त्यात ई-मेल आयडी, फोन नंबर आणि रिचार्ज स्किममध्ये तिला सहभागी होण्यास सांगण्यात आलं होतं.

या रिचार्जच्या माध्यमातून, महिलेला पैसे कमावता येऊ शकतात, असं आधी भासवण्यात आलं. कमिशन म्हणून या ही महिला वेबसाईटवरुन पैसे कमावेल, असं आधी दाखवण्यात आलं. यासाठी आधी महिलेनं 100 रुपये भरले आणि तिला 227 रुपये मिळाले. त्यामुळे ही महिला व्यवहार करत राहिली. असं करता करता महिलेने तब्बल 5 लाख 14 हजार भरले. पण तिला पैसे येणंच अचानक बंद झालं. टेलिग्राम ऍपवरही या महिलेनं तक्रार केली. या वेबसाईटच्या एक्झिक्युटिव्हशी संपर्क साधण्याचा प्रयत्न तिने केला. पण त्याला यश मिळू शकलं नाही. अखेर वैतागून महिलेनं पोलिसात तक्रार दाखल केली.

**ऑनलाईन कामाचं मायाजाळ**

अशीच आणखी एक घटना 43 वर्षांच्या महिलेसोबत घडली. एका 43 वर्षांच्या महिला आधी स्टोअर मॅनेजरमधून काम करत होती. काही ऑनलाईन प्रॉडक्टमध्ये पैसे गुंतवून ऑनलाईन कमिशन मिळवता येईल, असं या महिलेला भासवण्यात आलं. नोकरी गमावल्यानं ही महिला कामाच्या शोधात होती. तिला ही संधी वाटली आणि तिने पैसे गुंतवले. 160 रुपयांचे बेल्ट या महिलेनं ऑनलाईन खरेदी कोला. आणि तिला लगेचच 240 रुपये कमिशनसह परत आल्याचा मेसेज आला.



# ८४ पोलीस अधिकारी, कर्मचाऱ्यांना राष्ट्रपती पदक

## ४२ जणांना राष्ट्रपती शौर्य पदक; तिघांचा विशेष सेवेसाठी तर, ३९ जणांचा गुणवत्तापूर्ण सेवेसाठी सन्मान

**मुंबई :** देशाच्या ७५ व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त देण्यात येणाऱ्या राष्ट्रपती पोलीस पदकांची रविवारी घोषणा करण्यात आली. राज्यातील एकूण ८४ पोलिसांना राष्ट्रपती पदके जाहीर करण्यात आली. यापैकी ४२ जणांना राष्ट्रपती शौर्य पदक, तिघांना विशेष सेवेसाठी आणि ३९ जणांना गुणवत्तापूर्वक सेवेसाठी सन्मानित करण्यात येणार आहे.

राज्यातील तीन अधिकाऱ्यांना विशेष सेवेसाठी राष्ट्रपती पदकाने गौरविण्यात येणार आहे. राज्य गुप्तवार्ता विभागातील पोलीस मुख्यालयातील सहआयुक्त सुनील कोल्हे, ठाणे येथील वायरलेस विभागातील साहाय्यक पोलीस आयुक्त प्रदीप कन्नाळू, ओशिवारा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मनोहर धनावडे यांचा त्यात समावेश आहे. तर ४२ अधिकारी-कर्मचाऱ्यांना राष्ट्रपती शौर्य पदकाने सन्मानित करण्यात येणार आहे.



### गुणवत्तापूर्ण सेवेसाठी राष्ट्रपती पदकप्राप्त अधिकारी-कर्मचारी

नितीन पोतदार (पोलीस निरीक्षक, आर्थिक गुन्हे शाखा, क्रॉफर्ड मार्केट), श्रीकांत आदाटे (पोलीस निरीक्षक, पोलीस प्रशिक्षण केंद्र, मरोळ), राजेंद्र कोळी, (साहाय्यक पोलीस निरीक्षक फोर्स वन, गोरेगाव), सुनील कुवेसकर (पोलीस उपनिरीक्षक, मुख्य नियंत्रण कक्ष भायखळा), शंकर गावकर (पोलीस उपनिरीक्षक, सागरी पोलीस ठाणे, माहीम), जितेंद्र मोहिते (साहाय्यक पोलीस उपनिरीक्षक, गुन्हे शाखा, मुंबई शहर), राजेंद्र शिरके (पोलीस हवालदार, गुन्हे शाखा, वांद्रे), सुरेश कदम ( साहाय्यक पोलीस उपनिरीक्षक, दहशतवादविरोधी पथक, विक्रोळी), धनराज तळेकर (साहाय्यक पोलीस उपनिरीक्षक, बोरिवली), अशोक भोनवडे (गुप्तचर अधिकारी, राज्य गुप्तचर विभाग, मुंबई) यांचा समावेश आहे.

### राष्ट्रपती शौर्य पदकप्राप्त अधिकारी-कर्मचारी

राष्ट्रपती शौर्य पदकांपैकी ३६ पदके गडचिरोली येथे कार्यरत असलेल्या आणि मरणोत्तर पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना मिळाले आहेत. मनीश कलवानिया (पोलीस अधीक्षक, औरंगाबाद), भाऊसाहेब ढोले (पोलीस उपअधीक्षक, गडचिरोली), समीर शेख (अपर पोलीस अधीक्षक, गडचिरोली), संदीप मंडलिक (साहाय्यक पोलीस निरीक्षक, गडचिरोली), दयानंद महाडेश्वर (पोलीस उपनिरीक्षक, नवी मुंबई), महारुद्र परजाने (पोलीस उपनिरीक्षक, बीड), राजाराम खैरनार (पोलीस उपनिरीक्षक, नवी मुंबई), राजू कांदो (पोलीस नाईक, गडचिरोली), अविनाश कुमरे (पोलीस शिपाई, गडचिरोली), गोंगलू तिम्मा (पोलीस शिपाई, गडचिरोली), संदीप भांड (साहाय्यक पोलीस निरीक्षक, गडचिरोली), मोतीराम मडवी (साहाय्यक पोलीस उपनिरीक्षक, गडचिरोली) यांचा समावेश आहे. तर, जगदेव मडावी (पोलीस हवालदार, गडचिरोली), धनाजी होनमाने (पोलीस उपनिरीक्षक, गडचिरोली), किशोर आत्राम (पोलीस शिपाई, गडचिरोली) या तिघांना मरणोत्तर राष्ट्रपती शौर्य पदक देण्यात येणार आहे.


### प्रवासादरम्यान महिलांच्या ........

महागड्या वस्तू आणि पैसे लंपास करत होता. कल्याण जीआरपी आणि कल्याण रेल्वे क्राईम ब्रान्च या प्रकरणाचा तपास करत होते. पोलिस आयुक्त कैसर खालीद यांच्या मार्गदर्शनाखाली पा कल्याण रेल्वे क्राईम ब्रांचचे वरिष्ठ पोलिस निरिक्षक अर्शद शेख, पोलिस अधिकारी प्रकाश चौगुले,शंकर परदेशी पोलिस हवालदार रंजीत रासकर, वैभव जाधव, अजित माने, अक्षय चव्हाण यांचे पथक या चोरट्याच्या शोधात होते. कल्याण रेल्वे स्थानकात सीसीटीव्ही फूटेजमध्ये (CCTV) एक संशयित पोलिसांच्या नजरेत आला. काही दिवसापूर्वी हा संशयित तिकडे फिरत असताना पोलिसांनी पाहिले होते. त्याला ताब्यात घेऊन त्याची कसून चौकशी केली . शहजाद सय्यद असे त्याचे नाव असून शहजाद हा मूळचा अजमेर येथे राहणारा आहे . सध्या तो कल्याणच्या पत्रीपूल परिसरात भाडयाने खोली घेऊन राहत होता. 2017 मध्ये अहमदाबाद पोलिसांनी शहजादला रेल्वेतील चोरीच्या प्रकरणात अटक केली. कल्याणमध्ये त्याने 13 चोऱ्या केली असल्याचे उघड झाले आहे. पुढील तपास रेल्वे क्राईम ब्रान्च पोलिस करत आहेत.

# मुंबई मेट्रो मार्गिका -3 च्या सुधारित प्रस्तावास मान्यता

कुलाबा- वांद्रे- सीप्झ या मुंबई मेट्रो मार्ग-3 प्रकल्पाच्या सुधारित खर्चास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते. या प्रकल्पाच्या मूळ खर्चात 23 हजार 136 कोटींनी वाढ झाल्याने आता 33 हजार 405 कोटी 82 लाख रुपयांचा हा सुधारित खर्च असेल. प्रकल्पाच्या वाढीव खर्चात केंद्र शासनाचा सहभाग मिळण्याकरिता देखील केंद्र शासनास विनंती करण्यात येत आहे.सुधारित आराखड्यानुसार राज्य शासनाच्या हिश्याची रक्कम 2 हजार 402 कोटी 7 लाख वरुन 3 हजार 699 कोटी 81 लाख एवढी होत आहे. त्यामुळे राज्याच्या समभागापोटी 1 हजार 297 कोटी 74 लाख अशी वाढीव रक्कम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने मुंबई मेट्रो रेलला देण्यासंदर्भात प्राधिकरणाला निर्देश देण्यात आलेले आहेत. या सुधारित वित्तीय आराखडयानुसार जपान आंतरराष्ट्रीय सहकार्य संस्थेचे (जायका) कर्ज 13 हजार 235 कोटीवरुन 19 हजार 924 कोटी 34 लाख इतके झाले असून वाढीव रक्कमेचे कर्ज घेण्यास देखील मान्यता देण्यात आली.मुंबई मेट्रो मार्ग -3 ची एकूण लांबी 33.5 किमी असून हा मार्ग संपूर्ण भुयारी आहे. या मार्गात 26 भुयारी आणि एक जमिनीवरील अशी 27 स्थानकं असून वर्ष 2031 पर्यंत 17 लाख प्रवासी प्रतिदिन प्रवास करतील असा अंदाज आहे. ही मार्गिका सुरु झाल्यानंतर नरिमन पॉंईट, वरळी, वांद्रे कुर्ला संकुल व आंतरराष्ट्रीय व आंतरराज्य विमानतळ, मरोळ औद्योगिक वसाहत, सीप्झ अशी महत्वाची केंद्र मेट्रोने जोडली जातील. कुलाबा ते आंतरराष्ट्रीय विमानतळ 50 मिनिटात करणे सहज शक्य होणार आहे.सध्या बोगद्यांचे 98.6 टक्के एवढे काम झाले असून भूमिगत स्थानकांचे सुमारे 82.6 टक्के काम पूर्ण झाले आहे. या प्रकल्पासाठी 73.14 हेक्टर शासकीय जमिन व 2.56 हेक्टर खासगी जमिनीचे संपादन पूर्ण झाले आहे.

# रेल्वेत चोऱ्या करणाऱ्या टोळीला पोलिसांनी घातल्या बेड्या, दोन महिलाही ताब्यात









रेल्वेत प्रवास करणाऱ्या प्रवाशांना लुटणाऱ्या सराईत गुन्हेगारांच्या टोळीला औरंगाबाद लोहमार्ग पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. रेल्वे पोलिसांच्या गुन्हे शाखेच्या पथकाने एकूण पाच आरोपींच्या मुसक्या आवळत त्यांच्याकडून चोरीला गेलेल्या 22 लाख 43 हजार 400 रुपयांचा मुद्देमालासह 11 तोळे सोने जप्त केलं आहे. विशेष म्हणजे या टोळीत दोन महिलांचा सुद्धा समावेश आहे.

याप्रकरणी पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, जळगावचे राहणारे हरीश्चंद्र वरखडे हे एका पीशवीत42 तोळे सोने आणि रोख 52 हजार 400 रुपये घेऊन रेल्वे स्टेशन जळगाव येथून हावडा-मुंबई एक्सप्रेसने जळगाव ते मुंबई असा प्रवास करीत होते. दरम्यान त्यांच्या झोपेचा फायदा घेऊन चोरटयांनी वरिल मुददेमाल असलेली पिशवी चोरुन नेली होती. यांप्रकरणी रेल्वे पोलिसांनी सराईत गुन्हेगार सतबीरसिंग बलवंतसिंग टाक (वय 19 वर्षे रा. तांबापुरा जळगाव) याला रेल्वेतच ताब्यात घेतले असता त्याने रहीम खॉन रशीद खॉन (वय 22 वर्षे रा. ताबांपुरा ता. जि. जळगाव) याच्यासोबत मिळुन चोरी केल्याची कबुली दिली.

पोलीस पथक आरोपींच्या शोधात

मात्र चोरीस गेलेला मुददेमाल घेऊन रहीम शेख फरार झाला होता. त्यामुळे औरंगाबाद लोहमार्ग पोलीस अधिक्षक मोक्षदा पाटील यांच्या सुचनेनुसार तात्काळ स्थानिक गुन्हे शाखेचं एक पथक रहीम शेखच्या शोधात रवाना करण्यात आले. यावेळी पोलिसांनी तांत्रीक बाबींच्या मदतीने रहीम हा पाचोराकडुन कोणत्यातरी वाहनाने जळगाव कडे येत असल्याचं शोधून काढले.

भर पावसात लावला ट्रॅप

मिळालेल्या माहितीच्या आधारे रेल्वे पोलिसांनी पाचोरा ते जळगाव रोडवर पोलीस स्टेशन जळगाव MIDC येथील स्थानिक पोलीसांची मदत घेऊन भर पावसात ट्रॅप लावला. दरम्यान रात्री 12 वाजेच्या सुमारास एक रिक्षा पाचारोकडुन जळगावकडे येत असतांना पोलिसांना दिसला. पोलिसांनी यावेळी त्यास थांबण्याचा इशारा केला असता रिक्षाच्या मागील बाजुच्या पडदयामधुन रहीम उडीमारुन पळुन जावु लागला असता त्याचा पोलिसांनी पाठलाग केला, परंतु तो अंधाराचा फायदा घेऊन पळुन गेला.

आरोपींना ठोकल्या बेड्या

त्यांनतर पोलिसांनी अडवलेल्या रिक्षामध्ये पाहणी केली असता भावना जवाहरलाल लोढा (वय 40 वर्षे), तनीष्का भावना लोढा (वय 22 वर्षे, दोन्ही रा. रौनक नगर जळगाव) आणि अनिल रमेश चौधरी (वय 40 वर्षे रा. अयोध्या नगर, जळगाव) मिळून आले आहेत. त्यांची झडती घेतली असता गुन्ह्यात चोरीला गेलेला मुद्देमाल मिळून आला. त्यांनतर रहीम याला पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. तर या सर्व गुन्ह्यात उल्लेखनिय कामगीरी करणाऱ्या पथकाला पोलीस अधीक्षक मोक्षदा पाटील यांनी 10 हजार रोख बक्षीस व प्रशंशापत्र घोषीत केले आहे.

# अत्याचार करतानाचा व्हिडिओ बनवला, गर्भवती राहिल्यावर...; वाळूज उद्योगनगरीतील भयंकर घटना




औरंगाबाद जिल्ह्यातील वाळूज उद्योगनगरीत एक धक्कादायक प्रकार समोर आला असून, 22 वर्षीय परप्रांतीय तरुणीला लग्नाचे आमिष दाखवून गुंगीचे औषध पाजून अत्याचार करण्यात आला आहे. विशेष म्हणजे आरोपीने अत्याचार करतानाचा बनवत तो व्हायरल करण्याची धमकी देत वारंवार अत्याचार केला. या घटनेने खळबळ उडाली असून, याप्रकरणी वाळूज एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर आरोपीला अटक सुद्धा करण्यात आली आहे. सय्यद नबी सय्यद लाला (वय 35 वर्षे, रा. रांजणगाव) असे या नराधमाचे नाव आहे. याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पिडीत मुलगी ही मध्यप्रदेशातील आहे. मात्र तिच्या वडिलांचे निधन झाल्याने आणि परिस्थिती बिकट असल्याने ती 2016 मध्ये रोजगाराच्या शोधात वाळूज एमआयडीसीत आली होती. दरम्यान तिला एका कंपनीत रोजगार मिळाल्याने ती पंढरपुरात राही लागली. याच काळात तिची सय्यद नबी याच्यासोबत ओळख झाली होती. ओळखीचा फायदा घेत सय्यद नबी याने लग्नाचे आमिष दाखवून या मुलीला प्रेमाच्या जाळयात ओढले. गुंगीचे औषध पाजून अत्याचार केला... सुरवातीला पंढरपुरात वास्तव्यास असलेली पिडीत तरुण मुलगी पुढे वडगावात राहण्यासाठी गेली. त्यांनतर एक दिवस सय्यद नबी याने तिला गुंगीचे औषध पाजून तिच्यावर अत्याचार केला. तसेच अत्याचार करतानाचा तिचा व्हिडिओ मोबाईलमध्ये शूट करून ठेवला. यानंतर त्याने व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी देत तिच्यावर सतत अत्याचार केला.

# क्लासमधून काढल्याच्या रागातून कोचिंग शिक्षकाकडून विद्यार्थीनीचं अपहरण; पालघरमधील धक्कादायक घटना



शिक्षकी पेशाला काळीमा फासणारी घटना पालघर जिल्ह्यातील वाडा येथे समोर आली आहे. एका शिक्षकाने वाडा येथील सुरू असलेल्या खाजगी कोचिंग क्लासमधून मुलीला काढल्याने कोचिंग क्लास चालवणाऱ्या शिक्षकाने चक्क एका चिमुकल्या मुलीचंच अपहरण केलं. मात्र पालघर पोलिसांच्या सतर्कतेमुळे अवघ्या बारा तासात या मुलीचा शोध घेण्यात आणि आरोपीच्या मुसक्या आवळण्यात पालघर पोलीस प्रशासनाला यश आलं आहे.

समीर ठाकरे हा शिक्षक वाडा येथे चाणक्य कोचिंग क्लासेसच्या नावाने खाजगी क्लासेस घेत होता. याच खाजगी कोचिंग क्लासेसमध्ये सहावीत शिकणाऱ्या 13 वर्षीय विद्यार्थिनीनं प्रवेश घेतला. मात्र पीडित मुलीचे वडीलही शिक्षक असल्याने त्यांनी काही दिवसातच या मुलीला खाजगी कोचिंग क्लास सोडण्यास सांगितले. वडिलांनी सांगितल्यानंतर या मुलीनेही खाजगी कोचिंग क्लासमध्ये न जाण्याचा निर्णय घेतला. मात्र याचाच राग मनात धरून वाडा येथे चाणक्य कोचिंग क्लासेस चालवणाऱ्या आरोपी शिक्षकाने या मुलीचं अपहरण केलं.

शिक्षण विभागातील प्रकरणांशी संबंध, पोलिसांना संशय

एका कारमधून या मुलीला उचलून नेत वाडा तालुक्यातील ऐनशेत येथील एका फार्म हाऊसच्या खोलीत डांबून ठेवण्यात आलं. आपल्या मुलीचं अपहरण झाल्याचे लक्षात येताच वडिलांनी फिर्याद दिल्यानंतर पालघर पोलिसांनी आपली चक्र फिरवली आणि अवघ्या बारा तासात या चिमुकल्या मुलीची सुखरूप सुटका करून आरोपींच्याही मुसक्या आवळल्या. या प्रकरणी एका आरोपीला पोलिसांनी ताब्यात घेतल्या असून दोन आरोपी अजूनही फरार आहेत. त्यांचा शोध सध्या पालघर पोलिसांकडून सुरू आहे . तर दुसरीकडे या प्रकरणाचा काही वेगळा छडा लागतोय का? याचा तपास पालघर पोलीस करत आहेत. तर शिक्षण विभागात जी काही प्रकरण घडत आहेत. त्या बाबतीत ही पोलिसांना संशय असल्याचं म्हटलं आहे.

बिल्डिंगच्या आवारातून मुलीचं अपहरण

पीडित मुलगी आपल्या घरी परतत असताना तिच्या बिल्डिंगच्या आवारातून तिचं अपहरण करण्यात आलं. आपल्या खाजगी कोचिंग क्लासमधून मुलीला काढल्याचा राग खाजगी कोचिंग क्लास चालवणाऱ्या शिक्षकाच्या मनात असल्याचा दावा पीडित मुलगी आणि तिच्या कुटुंबीयांकडून करण्यात आला आहे. आपल्या मुलीची अवघ्या बारा तासात सुखरूप सुटका केल्याने पीडित मुलीच्या कुटुंबीयांकडून समाधान आणि पोलीस प्रशासनाचे आभार देखील मानले आहेत.

अवघ्या बारा तासात पीडित मुलीची सुटका

अवघ्या बारा तासात पीडित मुलीची सुटका करून आरोपींच्या मुसक्या आवळण्यात पालघर पोलिसांना यश आलं असलं तरी एका शिक्षकाने दुसऱ्या शिक्षकाच्या मुलीचे केलेले अपहरण करणं ही बाब धक्कादायकच आहे. त्यामुळे शिक्षकी पेशाला काळीमा फासणारी ही घटना असून खाजगी कोचिंग क्लासेस चालवणाऱ्या शिक्षकांविरोधात सध्या संताप व्यक्त केला जात आहे.

# बदलापूर: अखेर बारवी धरण ओव्हरफ्लो जिल्ह्याची पाणीचिंता मिटली



ठाणे जिल्ह्याच्या पाण्यासाठी महत्वाचे असलेले बारवी धरण गुरूवारी सायंकाळी पूर्ण क्षमतेचे भरले. सायंकाळच्या सुमारास धरणाने आपली ३४० दशलक्ष घनमीटरची पाणी पातळी गाठली. त्यामुळे ठाणे जिल्ह्याची पाणी चिंता मिटली आहे. बारवी धरणाच्या पाण्यावर जिल्ह्यातील जवळपास सर्वच महापालिका आणि औद्योगिक वसाहतींचा पाणीपुरवठा अवलंबून आहे. ठाणे जिल्ह्याला महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या बारवी धरणातून पाणीपुरवठा केला जातो. हे बारवी धरण गुरुवारी सायंकाळी पूर्ण क्षमतेने भरून वाहू लागले. गुरुवारी सायंकाळी साडेसहा वाजेपर्यंत बारवी धरण आपल्या ३४०.४८दशलक्ष घनमीटर क्षमतेने पूर्ण भरले होते. बारावी धरणाची उंची ७२.६०मीटर असून गुरुवारी धरणाने ही उंची गाठली. ही पाणी पातळी गाठली त्यामुळे ठाणे जिल्ह्याची पाणी चिंता मिटली आहे. बारावी धरणाच्या पाण्यावर ठाणे जिल्ह्यातील बहुतांश महापालिका, सर्वच औद्योगिक वसाहती आणि काही ग्रामपंचायती अवलंबून आहेत. मे महिन्याच्या अखेरीस बारावी धरणाने तळ गाठला होता. तर जून महिन्यात पावसाने ओढ दिल्याने ठाणे जिल्ह्यावर पाणी संकट गडद झाले होते. मात्र जुलै महिन्याच्या पहिल्या दोन आठवड्यात संतधर पावसाने बारवी धरणाच्या पाणी पातळीत मोठी वाढ केली. मात्र जुलै महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात पुन्हा पावसाने दांडी मारली. परिणामी धरण भरण्याचा वेग मंदावला होता. ऑगस्ट महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यापासून संततधार पावसाने धरणात पाण्याचा साठा केला. गुरुवारी सकाळी धरणात ९८टक्के इतका पाणीसाठा होता. तर सायंकाळी सहा वाजेपर्यंत बारवी धरण आपल्या पूर्ण क्षमतेने भरले होते. बारवी धरण भरल्याने जिल्ह्याची पाण्याची चिंता मिटली आहे.

# तिप्पट योजनेचे हजारो आर्थिक बळी ? ; गुंतवणूकदारांना तिप्पट परतावा देतो असे सांगून फसवणूक




भाग भांडवल बाजारात गुंतवणूक करून दीड वर्षात तिप्पट आणि दररोज अर्धा टक्के परतावा मिळवून देतो असे सांगून नागरिकांची फसवणूक करणाऱ्या दोन कंपन्यांविरोधात नौपाडा आणि श्रीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कंपन्यांच्या माध्यमातून सुमारे सात ते आठ हजार नागरिकांची सुमारे १० कोटी रुपयांची फसवणूक करण्यात आल्याचा अंदाज पोलिसांना आहे. याप्रकरणाचा तपास ठाणे पोलिसांच्या आर्थिक गुन्हे अन्वेषण शाखेकडून सुरू आहे. या दोन्हीप्रकरणात एकच तक्रारदार आहे असून यातील एका प्रकरणात पोलिसांनी रितेश पांचाळ आणि त्याचा सहकारी मोहन पाटील अशा दोघांना ताब्यात घेतले आहे.

यातील पहिल्या प्रकरणात तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, ते भाग भांडवल बाजारात दलाल म्हणून काम करतात. काही महिन्यांपूर्वी त्यांच्या एका परिचिताने त्यांना ठाण्यातील वागळे इस्टेट येथील महाकाली ग्रुप ऑफ कंपनी या कंपनीच्या कार्यालयात नेले. या कंपनीच्या कार्यालयात पोहचले असता, तिथे अनेकजण गुतंवणूकीसाठी आले होते. त्यावेळी कार्यालयात मोहन पाटील हे उपस्थित होते. त्यांनी त्यांच्या कंपन्यांच्या एकूण १६ उप कंपन्या असून यातील द मॅजिक ३ एक्स क्रिप्टो कंपनी ही सर्वाधिक नफा मिळवून देणारी कंपनी असल्याचे सांगण्यात आले. त्यामध्ये कमीत कमी २४ हजार रुपये गुंतवणूक करता येऊ शकत होती. २४ हजार रुपये गुंतवणूक केल्यास २० महिन्यांनी तिप्पट परतावा मिळेल तसेच दररोज अर्धा टक्के किंवा त्यापेक्षा जास्त परतावा मिळणार असल्याचे गुंतवणूकदारांना सांगण्यात आले होते. मोहन पाटील तेथे जमलेल्या गुंतवणूकदारांचे दोन तासांचे शिबीर घेतले. तसेच या कंपनीचे संचालक रितेश पांचाळ असून कंपनीत आतापर्यंत ५० हजार पेक्षा अधिक समाधानी गुंतवणूकदार गुंतवणूक करत असल्याचा दावा केला. त्यानंतर तक्रारदार यांनी रितेश यांची पवई येथील त्यांच्या कार्यालयात भेट घेतली आणि २९ जुलैला २४ हजार रुपयांची गुंतवणूक केली.

संपादकीय...



# भारताचा नियतीशी करार

ता. १५ ऑगस्ट २०२२ म्हणजे भारताचा ७६ वा स्वातंत्र्यदिन, स्वातंत्र्यदिनाचा अमृतमहोत्सवी वर्धापनदिन. मी लिहिलेला हा छोटा लेख म्हणजे स्वातंत्र्याच्या ७५ वर्षांनंतरचे भवितव्य काय असेल, याबद्दलचं माझं अगदी व्यक्तिगत चिंतन म्हणता येईल. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यावर एक दशकानंतर माझा जन्म झाला असला, तरी मी वाढलो ते स्वातंत्र्यसैनिकांच्या कुटुंबात. स्वातंत्र्यलढ्याच्या निमित्ताने त्या काळात भारतात निर्माण झालेली ऊर्जा, उत्कट वृत्ती आणि आदर्शवाद याचं बाळकडूच मला मिळालं. माझे पालक आणि त्यांचे सहकारी ज्यासाठी लढले, त्या स्वातंत्र्याचा संदर्भ या लेखात मी देत आहे.

ब्रिटिशांकडील सत्ता भारतीय अभिजनवर्गाकडे हस्तांतरित व्हावी, एवढ्या एकमेव कारणासाठी लढले नाहीत ते काही. केवळ नवीन शासन व्यवस्था स्थापन व्हावी, हाही त्यांच्या लढ्याचा उद्देश नव्हता. भारताला गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी म्हणून ते लढले. ही मनोवृत्ती ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीनं भारत बळकावण्याच्याही आधीपासूनची आहे. माझ्या आई-वडिलांच्या पिढीला मनापासून असं वाटत होतं की, ब्रिटिश सत्ताधाऱ्यांकडून केवळ स्वातंत्र्य मिळवणं पुरेसं नाही. सरंजामी संस्कृती, अंधश्रद्धा, जातिव्यवस्थेत जन्मापासून असलेली विषमता, सत्ताधाऱ्यांची गुलामगिरी - मग ते सत्ताधारी आक्रमक असोत, वसाहतवादी, सम्राट व राजे-महाराजे आणि त्यांचे हुजरे असोत, गावोगावचे सावकार आणि त्याहून महत्त्वाचं म्हणजे संघटित धर्मांचे दलाल - यांच्यापासून आपण स्वतःला मुक्त करणं आवश्यक आहे.

भारतीय स्वातंत्र्यसैनिकांच्या सुरुवातीच्या पिढीवर पाश्चात्य आणि मार्क्सवादी विचारसरणीचा पगडा होता. भारतीय लोकव्यवहार, संवेदनशीलता आणि कुतुहल यातून रुजलेला मार्ग अनुसरण्यात महात्मा गांधी यांची दूरदृष्टी दिसून येते. दुर्दैवाने गांधींचा अकाली अंत झाला. तरीही तळागाळातील सहभागातून समतावादी, कनवाळू, मानवतावादी आणि अहिंसकरीत्या परिवर्तन करण्याचा त्यांनी दिलेला संदेश आजही प्रसंगोचित ठरतो. त्यातूनच जनसामान्यांचे हित पाहणारी लोकशाही व्यवस्था उभी राहते.

आत्मविश्वासाचा अभावस्वातंत्र्याची पंचाहत्तरी पूर्ण झालेल्या या वर्षात भारतीय माणसाला अजूनही अनेक अडथळे ओलांडायचे आहेत. प्रगती करण्यासाठी कोणी तरी कणखर नेता असावा, अशी अजूनही आमची अपेक्षा आहे. निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींचे आम्ही मालक आहोत, ही भूमिका ठामपणे बजावण्याच्या आत्मविश्वासाचा आमच्यामध्ये अभाव दिसतो. आम्ही अजूनही सत्ताधाऱ्यांच्या कृपाकटाक्षांची आशाळभूतपणे अपेक्षा करीत राहतो. संघटित धर्माचा आणि भोंदू बाबा-बायांचा जबरदस्त पगडा आपल्या मनावर आहे.

त्याच्या परिणामी समस्या सोडविण्यासाठी आवश्यक असलेला गंभीर, तर्कशुद्ध आणि कल्पक मार्ग अंगीकारण्यासाठी आपण मानसिकदृष्ट्या पांगळे बनतो. स्वातंत्र्य चळवळीतून जन्माला आलेली राष्ट्रवादाची संकल्पना तेव्हाच्या तातडीच्या उद्दिष्टांसाठी अतिशय सुसंगत होती, असं म्हणण्याचं धाडस मी करतोय. तथापि मानवजातीला किंवा माणुसकीला आज भेडसावणाऱ्या समस्या सोडविण्यासाठी संकुचित आणि बहिष्कृत करणाऱ्या विचारसरणीचं अनुकरण करणं, अजिबात चालणार नाही. त्या ऐवजी अधिक मानवतावादी आणि सर्व जीवसृष्टीचा विचार करणारा पर्यावरणीय दृष्टिकोन अंगीकारण्याची गरज आहे. प्रबळ राजकीय विचारसरणी म्हणून धर्माचा उदय होणं, हे तर फारच वाईट. त्यातून सामूहिक जाण, चौकसपणा विकसित करणे, विज्ञानाचा उपयोग आणि नवीन विचारांचा स्वीकार करण्याची आपली ताकद दुबळी होते.

हवेत सौहार्दपूर्ण संबंध

माझ्या मातृभूमीसाठी मी एक स्वप्न पाहतो. माझ्या आई-वडिलांनी भारताचं जे स्वप्न पाहिलं होतं, त्यातूनच ते जन्मास आलं आहे. माझं आजचं स्वप्न म्हणजे माणुसकीसाठीचं स्वप्न आहे. एकमेकांशी आणि निसर्गाशी असलेल्या आपल्या जवळिकीला हे स्वप्न अलगद स्पर्श करतं. अस्मितेचं राजकारण, धार्मिक राष्ट्रवादाला माझ्या मातृभूमीने रामराम ठोकावा आणि मोठ्या समस्या सोडविण्यासाठी एकदिलाने सहकार्य करण्यासाठी वचनबद्ध व्हावं, असं मला मनापासून वाटतं. तिरस्कार, द्वेष करणाऱ्या सामाजिक माध्यमांवरील टिप्पण्या टाळायला हव्यात. सौहार्दपूर्ण संबंधांसाठी आणि त्यातून निर्माण होणाऱ्या सर्जनशीलतेसाठी आपण संवाद साधण्याची गरज आहे.

कोणा एखाद्याची प्रगतीची आस आणि समृद्ध होण्यासाठीची धडपड अन्य कोण्या व्यक्तीच्या किंवा समाजाच्या सन्मानाने जगण्याच्या हक्कावर गदा आणत नाही ना, हे आपण बारकाईने पाहिलं पाहिजे. सारे समान असलेला समाज ('जस्ट सोसायटी') निर्माण करण्यामध्ये धर्म, राष्ट्रीयत्व, लिंगभेद, त्वचेचा वर्ण, जात, वंश यांचा अडथळा कदापि येणार नाही, याचीही काळजी आपण घ्यायला हवी. 'केअरिंग अँड शेअरिंग' - परस्परांची काळजी घेणं आणि दुःख-आनंद वाटून घेणं हीच आपल्या राजकारणाची मूलभूत विचारसरणी व्हावी, अशी आशा मी भारताच्या स्वातंत्र्यदिनाच्या आजच्या अमृत महोत्सव दिनी करतो. द्वेषाचे राजकारण सोडून आपण एकमेकांशी संवाद साधू या. आपण ज्या विश्वाशी जोडले गेलो आहोत, तिथे प्रगतीच्या आणि समृद्धीच्या रगड संधी आहेत. त्या सुवर्णसंधीची कवाडे आपल्या परस्परांशी असलेल्या जवळिकीतून व संवादातून उघडतील.

द्वेषाचे राजकारण सोडून आपण एकमेकांशी संवाद साधू या. आपण ज्या विश्वाशी जोडले गेलो आहोत, तिथे प्रगतीच्या आणि समृद्धीच्या रगड संधी आहेत. त्या सुवर्णसंधीची कवाडे आपल्या परस्परांशी असलेल्या जवळिकीतून व संवादातून उघडतील.

• • •

# 'भारतीय' राष्ट्रवाद पराभूत नाही..

बुद्धिभेद, जड संस्कृताळलेली भाषा, अतार्किक आणि सोयीस्कर मांडणी करून मूळ हेतू लपवण्याच्या कुटिलनीतीचा वापर रा. स्व. संघाकडून स्थापनेपासूनच होत आला आहे.

५ ऑगस्टला 'रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी'चे महासंचालक रवींद्र साठे यांच्या 'राष्ट्रभाव' या सदरात प्रकाशित झालेल्या 'हिंदी राष्ट्रवादाचा पराभव कशामुळे?' या याच पठडीतील लेखाचे नाव खरे तर 'हिंदू राष्ट्रवादाचा पराभव कशामुळे?' असे असले पाहिजे होते. ते का याचा आढावा घेऊ.

स्वातंत्र्यपूर्व काळात 'राष्ट्रवादाच्या संदर्भातील हिंदी राष्ट्रवाद, हिंदू राष्ट्रवाद आणि द्विराष्ट्रवाद असे तीन विचारप्रवाह पुढे आले' असे लेखक म्हणतात. त्यातील द्विराष्ट्रवादाचे मुस्लीम मूलतत्त्ववाद्यांप्रमाणे सावरकरांसारखे अनेक हिंदू राष्ट्रवादीही समर्थक असल्याने या विचारप्रवाहाबद्दल पुरेसे विवेचन साठे करत नाहीत. पण काँग्रेसने स्वातंत्र्य मिळवण्यासाठी सनदशीर पद्धतीने लढा दिला. यात सर्व जाती-धर्माचा समावेश व्हावा म्हणून हिंदी राष्ट्रवादाची कल्पना जन्मास आणली असे म्हणून स्वातंत्र्यलढ्यातील मूल्यांतून भारतीय राष्ट्रवादाचा जन्म झाला व हिंदू राष्ट्रवाद्यांचे या लढ्यात फारसे योगदान नव्हते हे लेखक मान्य करतात हे नसे थोडके! साठे यांनी 'भारतीय राष्ट्रवाद' हा शब्द वापरण्याऐवजी फारसा प्रचलित नसलेला 'हिंदी राष्ट्रवाद' हा शब्द वापरला आहे.

भारतीय राष्ट्रवादाचा पराभव भारताचे १९४७ साली विभाजन झाले तेव्हाच झाला, असे लेखक म्हणतात. परंतु फाळणीसाठी कारणीभूत असलेल्या द्विराष्ट्रवादाच्या सिद्धांतामागे हिंदू राष्ट्रवादी आणि मुस्लीम मूलतत्त्ववादी दोन्ही संघटना होत्या हे सांगायचे विसरतात. असे असतानाही विभाजनपूर्व भारतात असलेल्या मुस्लीम लोकसंख्येच्या एकतृतीयांश लोकसंख्येने भारतातच राहण्याचा निर्णय घेतला, हा हिंदू राष्ट्रवाद्यांचा पराभव नव्हे काय?

काँग्रेसच्या विचारातील भारतीय राष्ट्रवाद 'तर्कशुद्ध व स्वयंसिद्ध नव्हता' असे लेखक म्हणतात. मग गेली ९७ वर्षे संघाला आपला विचार जनतेला का पटवून देता आला नाही? आजही देशातील विरोधी पक्षांची सरकारे पाडण्यासाठी अलोकशाही पद्धतीचा वापर का करावासा वाटतो? स्वतःचा विचार तर्कशुद्ध असेल तर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या संघटना देशात धार्मिक अशांतता पसरवावी याकरिता स्थापनेपासून कार्यरत का आहेत, या प्रश्नांची उत्तरे लेखकाला द्यावी लागतील.

'हिंदू राष्ट्रवादा'तील वैचारिक विरोधाभास

हिंदू राष्ट्रवादाच्या पराभवाचे खरे कारण हेच आहे की आजवर हिंदुत्ववादी नेत्यांना हिंदुत्वाची व्याख्यादेखील नीटपणे करता आलेली नाही आणि त्यातही हिंदुत्ववादी संघटनांमध्ये विरोधाभास व अंतर्विरोध मोठ्या प्रमाणात आहे. याचकरिता संघाला गोळवलकरांचे विचार दडवून इतर नेत्यांना पुढे करावे लागते. याही लेखात रवींद्र साठे यांनी सावरकर, टिळक, विवेकानंदांचा उल्लेख करताना गोळवलकरांचा उल्लेख मात्र टाळला आहे.

हिंदुत्ववादी नेत्यांच्या विचारातील विरोधाभास सांगायचा झाला तर सावरकरांपासून सुरुवात करावी लागेल. '१८५७ चे स्वातंत्र्यसमर' या पुस्तकाच्या प्रस्तावनेत सावरकरांनी मुस्लिमांबद्दल द्वेष बाळगणे हे मूर्खपणाचे म्हटले होते.



६ जुलै १९२० ला ब्रिटिश सरकारला लिहिलेल्या पत्रात सावरकर विश्वकुटुंबाची व्याख्या करतात आणि अशा संयुक्त राष्ट्र कुटुंबासाठी सहकार्य करीन असे आश्वासन देतात. नंतर मात्र हेच सावरकर विश्वकुटुंबाची संकल्पना विसरून 'पितृभू आणि पुण्यभू'च्या आधारे आपल्या हिंदुत्वाच्या केलेल्या व्याख्येतून मुस्लीम आणि ख्रिश्चनांना वेगळे काढतात. परंतु देशातील नास्तिकांचे काय होणार हे मात्र सांगत नसल्याने सावरकर स्वतःही हिंदुत्वाच्या व्याख्येत बसतात का हा प्रश्न उपस्थित होतो. सावरकर 'हिंदुत्व म्हणजे हिंदू धर्म नव्हे आणि हिंदू धर्म म्हणजे वैदिक धर्म नव्हे' असे म्हणतात. हिंदू धर्म म्हणताना सावरकरांना या देशातील पुण्यभू असणारे वैदिक, बौद्ध, जैन व शीख हे सर्व अभिप्रेत होते. पण हेच सावरकर पुढे बाबासाहेब आंबेडकरांनी बुद्ध धर्म स्वीकारला त्या वेळी त्यांना 'धर्मद्रोही' म्हणतात, हा विरोधाभास नव्हे काय? पंतप्रधान मोदींनी नुकतेच अशोकस्तंभाच्या राष्ट्रीय चिन्हाचे उद्घाटन करताना वैदिक पद्धतीने केलेली पूजा सावरकरांच्या 'हिंदू धर्म म्हणजे वैदिक धर्म नव्हे' या मताशी फारकत नाही का? असो!

पुढे हेच सावरकर आपल्या राष्ट्रवादाच्या कल्पनेत, 'या देशात मुस्लीम राष्ट्राचे वेगळे अस्तित्व आहे' असे मान्य करतात. त्याच वेळी आपल्या हिंदू राष्ट्रवादाच्या परिभाषेत 'अल्पसंख्याकांच्या धार्मिक व शैक्षणिक अधिकाराचे संरक्षण करू' असे आश्वासनही देतात. (हिंदू महासभा अधिवेशन अध्यक्षीय भाषण – १९३९ ) याबाबत लेखक अनभिज्ञ आहेत का?

देशातील दुसरे हिंदू राष्ट्रवादी नेते एम.एस. गोळवलकर यांनी सावरकरांची हिंदुत्वाची व्याख्या स्वीकारली होती. परंतु सावरकरांचे गाईबद्दलचे मत, विज्ञानवादी दृष्टिकोन, उपयुक्ततावादाच्या सिद्धांतावर वाईट भाषेत टीका केलेली आहे. भाई परमानंद या हिंदू राष्ट्रवादी नेत्याच्या हिंदू साम्यवादी संघटनेवर टीका करताना 'कोणी मनुष्य एक तर हिंदू असेल किंवा साम्यवादी असेल' असे गोळवलकर म्हणतात. चातुर्वण्र्य व्यवस्थेचे गोळवलकरांनी केलेले समर्थन तसेच सावरकरांच्या पोथ्यापुराणांबद्दलच्या मतांचा अव्हेर हिंदू राष्ट्रवादींच्या मतांतील विरोधाभास दर्शवत नाही का?

जातिभेद हे वर्णव्यवस्थेचे विकृत स्वरूप आहे असे गोळवलकर म्हणतात. पण ही व्यवस्था संपवण्याची दीक्षा मात्र ते संघाच्या कार्यकर्त्यांना देत नाहीत. जातिभेद सांभाळून समरस व्हा असे म्हणतात. 'समता' या शब्दाच्या संघाला असलेल्या अॅलर्जीवर साठे यांनी प्रकाश टाकावा.

गांधीजींचा 'भारतीय राष्ट्रवाद' भारतीय (हिंदी) राष्ट्रवादात हिंदू, मुसलमान, ख्रिश्चन इत्यादी भेदांना स्थान खचितच नव्हते. कारण हा राष्ट्रवाद गांधीजींच्या विचारातून आला होता. गांधींचा विचार संघाच्या किंवा हिंदू राष्ट्रवादींच्या विचाराप्रमाणे मुस्लीम मूलतत्त्ववाद्यांच्या विचाराची प्रतिक्रिया म्हणून जन्माला आलेला नव्हता. तर तो विचार स्वतःला 'सनातनी हिंदू' म्हणवणाऱ्या एका राष्ट्रसंतांचा होता. ज्या स्वामी विवेकानंदांच्या १२ नोव्हेंबर १८९७ च्या लाहोरमधील भाषणाचा उल्लेख करून विवेकानंदांच्या मुखात आपले बोल टाकण्याचा प्रयत्न साठे करतात, त्या भाषणातच भारतातील अद्वैतवादाचा जगाला लाभ कसा होईल हे सांगताना भारताला 'तथागत गौतम बुद्धांचे हृदय आणि श्रीकृष्णाच्या गीता ज्ञानाची आवश्यकता आहे' असेदेखील स्वामी म्हणतात. गांधीजींच्या मनात हे दोन्ही होते. खरा हिंदू कसा असावा हे गांधी आपल्या आचरणातून सांगत. हिंदू राष्ट्रवाद्यांप्रमाणे मुस्लीम मूलतत्त्ववाद्यांकडे बोट दाखवून हिंदूंना कट्टर बनवण्याची दीक्षा त्यांनी दिली नाही.

या देशातील विविधतेचा सन्मान करून एक राष्ट्र म्हणून गुंफण्याचे काम महात्मा गांधी यांच्या नेतृत्वात काँग्रेसने केले. संविधानाने त्याला आधार दिला. डॉ. आंबेडकरांनी संविधान स्वीकारताना केलेल्या भाषणात ही राष्ट्र घटना भारताला एक राष्ट्र करण्याच्या प्रयत्नात महत्त्वाची भूमिका बजावेल, असे मत उगीच व्यक्त केले नव्हते.

मुस्लिमांनी हिंदी व्हावे यासाठी मुस्लीम नेतृत्वाकडून कष्ट घेतले गेले नाहीत असे म्हणणाऱ्या साठे यांना हे दिसत नाही की, काँग्रेसच्या नेतृत्वात स्वातंत्र्यसंग्रामात मुस्लिमांनीही मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला होता. एम. ए. अन्सारी, हकीम अजमल खान, मौलाना अबुल कलाम आझाद, सैफुद्दीन किचलू, असफ अली, अब्बास तय्यबजी, युसुफ मेहर अली इत्यादी अनेक जणांची नावे घेता येतील. ज्याप्रमाणे हिंदूंना स्वातंत्र्यसंग्रामात भाग घेण्यापासून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने रोखले त्याचप्रमाणे स्वातंत्र्यसंग्रामात भाग घेत असलेल्या अनेक मुसलमानांना मुस्लीम मूलतत्त्ववादी रोखत होते हे विशेष!

विचारांचा विपर्यास

'लोकमान्य टिळक आणि स्वामी विवेकानंद यांनी मुस्लीम मनोवृत्तीची चिकित्सा केली, पण काँग्रेसने केली नाही' असे मत साठे व्यक्त करतात. पण पुढे 'टिळकांना हिंदू-मुस्लीम ऐक्य अपेक्षित होते,' असे स्वतःच मान्य करतात. स्वामी विवेकानंद यांच्या मते तर 'वेदान्तातील उदारमतवादाचा भारतातील इस्लामवर मोठा परिणाम झाला आहे'. आपल्या एका शिष्याला या संदर्भात स्वामी विवेकानंद म्हणाले होते की मुघल सम्राट शहाजहानला परकीय म्हटल्यास त्याच्या कबरीतील मृतदेहाचादेखील थरकाप होईल. आपल्या देशात मुस्लीम शरीर आणि वैदिक मन या दोन आदर्शाचा संगम व्हावा ही स्वामींची एकमेव प्रार्थना असे. ती टिळकांच्या नावावर खपवणे लेखकाचे अज्ञान दर्शवते.

मुसलमान राजवटीचे भारतातील योगदान हे की गरिबांची आणि दलितांची स्थिती सुधारली असे विवेकानंद म्हणतात. (स्वामी विवेकानंदांची खरी ओळख – ले. दत्तप्रसाद दाभोळकर, पृष्ठ १४८-१५०) या देशातील इतिहास मुस्लिमांचादेखील आहे याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष तसेच महान विभूतींच्या वक्तव्याचा विपर्यास हिंदू राष्ट्रवाद्यांनी आपल्या स्वार्थी राजकारणासाठी केला हेच सत्य आहे.

२४ जानेवारी १९४८ च्या पंडित नेहरूंच्या मुस्लीम विद्यार्थ्यांपुढे केलेल्या भाषणाचा साठे यांनी केलेला विपर्यास याच पठडीतील आहे. पंडित नेहरू भारताला बौद्धिक आणि सांस्कृतिक श्रेष्ठत्व मिळवून देणाऱ्या पूर्वजांविषयी व त्या वारसाविषयी अभिमान वाटतो का? हा प्रश्न विचारतात. पुढे 'हा सांस्कृतिक वारसा हिंदू आणि मुसलमान या दोघांचाही आहे' असे म्हणतात. याच भाषणात मी हे प्रश्न का विचारतो आहे याचे कारण देताना नेहरू म्हणतात की 'गेल्या काही वर्षांत अनेक शक्ती जनतेचे लक्ष विचलित करण्याचे आणि देशाचा इतिहास विकृत करण्याचा प्रयत्न करत आहेत.' या भाषणानंतर केवळ सहा दिवसांतच गांधीजींची हत्या झाली. त्यामुळे त्यांचा रोख कोणाकडे होता हे सांगण्याची आवश्यकता आहे का?

• • •

# युनियन बँकेत तारण ठेवलेले दागिने निघाले नकली

अमरावती कर्जासाठी तारण ठेवलेले सोन्याचे दागिने नकली असल्याचे समोर आले. या प्रकरणी युनियन बँकेच्या राजापेठ शाखेतल्या अधिकारी व कर्मचाऱ्याविरोधात संबंधित फिर्यादीच्या तक्रारीवरून शुक्रवारी रात्री फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




उज्वल राजेशराव मळसने वय 41 वर्षे राहणार आचल विहार कॉलनी असे फसवणूक झालेल्या व्यक्तीचे नाव आहे.

असे आहे प्रकरण उज्वल मळसने यांनी 31 डिसेंबर 2020 रोजी युनियन बँक ऑफ इंडियाच्या राजापेठ शाखेत 100 ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने तारण ठेवून 3 लाख 30 हजार कर्ज घेतले होते. त्यांच्या दागिन्यांची मूळ किंमत 5 लाख 50 हजार होती. त्यांच्याकडून कर्जाचे हप्ते नियमित फेडणे सुरू होते. 6 ऑगस्ट 2022 रोजी शाखा प्रबंधक यांनी मळसने यांना बँकेत बोलावून तारण ठेवलेले सोन्याचे दागिने दाखविले असता ते नकली असल्याचे दिसले. या प्रकारामुळे उज्वल मळसणे हादरले.

राजपेठ पोलीस ठाण्यात तक्रार या संदर्भात मळसने यांनी राजापेठ पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. तक्रारीवरून पोलिसांनी बँकेच्या ताब्यात असलेले दागिने नकली दाखवून मळसने यांच्या दागिन्यांचा अपहार करुन फसवणूक केल्याचा गुन्हा युनियन बँकेच्या राजापेठ शाखेतल्या अधिकारी व कर्मचाऱ्यावर दाखल केला असल्याने राजापेठ पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक मनीष ठाकरे यांनी सांगितले. ते पुढे म्हणाले या संदर्भात बँकेकडे कागदपत्रांची मागणी करण्यात आली आहे. घटना घडली तेव्हा कोणते अधिकारी आणि कर्मचारी होते याची माहिती मागितली आहे. बँकेकडून अद्याप कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही. कागदपत्रे व बँकेचे म्हणणे प्राप्त झाल्यावर पुढील तपास करण्यात येईल. या प्रकरणाचा तपास आर्थिक गुन्हे शाखेकडे जाण्याची शक्यताही त्यांनी वर्तविली आहे.

# धक्कादायक! आश्रमात तीन अल्पवयीन मुलींवर अत्याचार, नवी मुंबईतील चर्चमधील घटनेने खळबळ

मुंबई : नवी मुंबईत एक धक्कादायक घटना समोर आलीय. सीवूड्स मधील बेथेल गॉस्पेल चॅरिटेबल ट्रस्टच्या चर्चमधील आश्रमात तीन अल्पवयीन मुलींवर अत्याच्यार करण्यात आलेत. याबाबत एनआरआय पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आलाय.बेकायदेशीररीत्या चालविण्यात येत असलेल्या आश्रमशाळेवर ठाणे जिल्हा महिला बाल विकास विभागाने कारवाई कर अल्पवयीन 45 मुलांची सुटका केली होती. यामध्ये 13 मुलींचा समावेश होता. या मुलींकडे अधिक चौकशी केली असता यातील ती मुलींचे शोषण झाल्याचे समोर



आल्यानंतर एनआरआय पोलीस ठाण्यात चर्च विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बेथेल गॉस्पेल चॅरिटेबल ट्रस्टच्या चर्चमध्ये लहान मुले, मतीमंद महिला असून तेथे गैरप्रकार सुरू असल्याची माहिती ठाणे महिला बाल विकास विभागाला मिळाली होती. माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी छापा टाकून 45 मुलांची सुटका केली. या सर्वांना उल्हासनगर मधील शासकीय बालगृहात ठेवण्यात आले आहे. सुटका करण्यात आलेल्या 12 ते 14 वयोगटातील तीन मुलींवर लैंगिक अत्याचार झाल्याचे समोर आले आहे. मुलीच्या अंगाला विक्स आणि तेल लावणे, त्यांना गुगीची गोळी देऊन झोपवून ठेवले जात असल्याचे मुलींनी सांगितले आहे. यातील एका मुलीचा गर्भपात देखील केल्याची धक्कादायक माहिती समोर येत असून मुलींच्या पालकांना भेटू न देण्याचे प्रकार समोर आले आहे. या धक्कादायक घटनेप्रकरणी ठाणे जिल्हा महिला - बाल विकास विभागाने एनआरआय पोलीस ठाण्यात विनयभंग आणि पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल करून चर्च मधील केअरटेकरला ताब्यात घेतले आहे.

## ॲमेझॉन कंपनीची कोट्यवधींनी फसवणूक, बनावट आयडीद्वारे सायबर गुन्हेगारांनी लावला चुना

नागपूरः सायबर गुन्हेगारांनी सामान्य नागरिकांसह ई-कॉमर्स कंपन्यांकडे आता आपला मोर्चा वळविला आहे. यापूर्वीही काही प्रकरण समोर आले आहेत, मात्र नागपुरात पहिल्यांदाच असे प्रकरण पुढे आले आहे. सायबर गुन्हेगारांनी अमैझॉन कंपनीची बनावट आयडी बनवून विक्री आणि खरेदीच्या नावावर कंपनीला 3 कोटी रुपयांचा चुना लावला आहे. एमआयडीसी पोलिसांनी हिंगणा मार्गावरील अमैझॉन ट्रांस्पोर्टेशन सर्व्हीस प्रा. लि. चे व्यवस्थापक हेमंत पाखोडे (32) च्या तक्रारीवरून अज्ञात आरोपींवर गुन्हा नोंदविला आहे. मात्र फसवणुकीची रक्कम 10 ते 15 कोटी रुपयांपर्यंत जाण्याचा अंदाज असल्याने घटनेचा तपास गुन्हे शाखेची आर्थिक गुन्हे शाखा आणि सायबर पथक मिळून करीत आहेत.




5,731 वस्तू मागवल्या

सायबर गुन्हेगारांनी 9 ते 16 एप्रिल 2022 दरम्यान ही फसवणूक केल्याचा अंदाज आहे. ठकबाजांनी सर्वप्रथम ई-कॉमर्स प्लेटफॉर्मवर विक्रेत्यांच्या नावावर आयडी बनवली. या माध्यमातून वेगवेगळे उत्पादनांची विक्री सुरू केली. सोबतच ग्राहकांच्या नावावरही आयडी तयार करण्यात आली आणि कंपनीच्या नावाची नोंदणी केली. या बनावट आयडींच्या माध्यमातून कंपनीकडून 5,731 वेगवेगळया वस्तू मागवण्यात आल्या. सर्व वस्तू मागवताना 'कॅश ऑन डिलिव्हरी'चा पर्याय निवडला होता. मात्र प्रत्यक्षात या वस्तूंची डिलिव्हरी झालीच नव्हती, मात्र कंपनीला वस्तू संबंधित व्यक्तीला मिळाल्याची माहिती देण्यात आली. त्यानंतर पाठविलेल्या वस्तूंमध्ये बिघाड किंवा इतर कारणे सांगून 'ऑर्डर' कॅन्सल करण्यात आले. जेव्हा ऑर्डरच डिलिव्हर झाले नव्हते तर परत करण्याचा प्रश्नच नव्हता. तरीही आरोपींनी अमैझॉनच्या 'ऑटोमॅटिक रिफंड' प्रणालीचा उपयोग करून पैसे आपल्या खात्यात जमा करून घेतले.

## दारूच्या गुन्ह्यात आरोपी कारागृहात स्थानबद्ध; राज्य उत्पादनची राज्यातील पहिली 'एमपीडीए' कारवाई

दारूच्या गुन्ह्यात एका कुख्यात आरोपीला राज्य उत्पादन शुल्क विभागाने एमपीडीएसारख्या कारवाईचा बडगा उगारत कारागृहात स्थानबद्ध केले आहे. राज्यभरातील उत्पादन शुल्कची ही पहिलीच कारवाई असल्याची माहिती शुल्क विभागाने दिली आहे. कृष्णा सीताराम पोटदुखे (वय 38 वर्षे, रा. बाळापुर गावठाण, औरंगाबाद) असे स्थानबद्ध करण्यात आलेल्या कुख्यात आरोपीचे नाव आहे.



याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पोलीस ठाणे सातारा हद्दीतील कृष्णा पोटदुखे याच्यावर दारू विक्री आणि तस्करीचे अनेक गुन्हे दाखल आहेत. तसेच परराज्यातील दारूची तस्करी करण्यात तो सराईत आहे. तसेच महाराष्ट्र राज्यात विक्रीस प्रतिबंधीत असलेली दादरा नगर हवेली व दिव-दमन या केंद्रशासीत प्रदेशातील विदेशी दारू उपलब्ध करून तो बेकायदेशीर हातभट्टीच्या व्यवसायात गुंतलेले होता.

पोलीस आयुक्तांकडे प्रस्ताव

मानवी आरोग्यास घातक असलेल्या बनावट विदेशी दारु रसायन मिसळून तयार करण्यास त्याचा हातखंडा आहे. त्याच्यावर अनेकदा कारवाया करूनही कोणताही फरक पडला नाही. त्यामुळे राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक यांनी कृष्णा पोटदुखेवर 'एमपीडीए' कारवाई करण्याबाबतचा प्रस्ताव पोलीस आयुक्त निखील गुप्ता यांच्याकडे सादर केला होता. अखेर आयुक्तांनी त्याच्यावर एमपीडीए कायद्यानुसार कारागृहात स्थानबद्ध करण्याचे आदेश दिले आहेत.

परिसरातील सार्वजनिक सुव्यवस्थेवर परिणाम

कृष्णाच्या धोकादायक कारवायांमुळे परिसरातील सर्व सामान्य जनतेच्या मनात असुरक्षिततेची भावना निर्माण झालेली आहे. त्याचा बेकायदेशीर व्यवसाय आणि ग्राहकांना संरक्षित ठेवण्यासाठी तो त्या भागातील लोकांना शिवीगाळ धमक्या आणि मारहाण सुध्दा करत होता. त्यामुळे त्याच्या हातभट्टीच्या व्यवसायाने पोलीस ठाणे सातारा हद्दीतील, औरंगाबाद आणि नजिकच्या परिसरातील सार्वजनिक सुव्यवस्थेवर परिणाम होवून धोका निर्माण झाला होता.

राज्यातील पहिली कारवाई...

आतापर्यंत पोलिसांकडून दरोडेखोर, चोऱ्या, वाळू माफिया यांच्यावर एमपीडीए कायद्याचा वापर करून कारवाई करण्यात आली आहे. मात्र दारूच्या गुन्ह्यात एखांद्या व्यक्तीवर एमपीडीएचा वापर करून कारागृहात स्थानबद्ध करण्याची ही राज्यातील पहिलीच कारवाई असल्याची माहिती राज्य उत्पादन शुल्कचे पोलीस अधीक्षक संतोष झगडे यांनी दिली आहे. विशेष म्हणजे यापूर्वी सुद्धा झगडे यांनी पुण्यात असतांना असे प्रस्ताव दिले होते, मात्र ही राज्यात पहिलीच कारवाई ठरली आहे. त्यामुळे अवैध दारू विक्री प्रकरणात सुद्धा एमपीडीएची कारवाई होऊ शकते याचे हे उत्तम उदाहरण ठरले आहे.

## अंबानींना जीवे मारण्याची धमकी, दहिसरमधून 57 वर्षीय संशयित ताब्यात

मुकेश अंबानी आणि त्यांच्या कुटुंबीयांना जीवे मारण्याची धमकी देणाऱ्या एका संशयिताला मुंबई पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. धमकी दिल्याची तक्रार दिल्यानंतर मुंबई पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली आणि एका संशयिताला ताब्यात घेतले आहे. दहिसरमध्ये ही कारवाई करण्यात आली. सकाळी 10.30 वाजण्याच्या सुमारास रिलायन्स फाउंडेशन हॉस्पीटलच्या सार्वजनिक दूरध्वनी क्रमांकावर एका अनोळखी नंबरवरून धमकी देणारा एक फोन कॉल आला होता. याची तक्रार डी. बी. मार्ग पोलीस ठाण्यात दाखल झाल्यानंतर पोलिसांनी वेगाने तपास सुरू केला. त्याच वेळी अंबानी यांच्या अँटिलिया निवासस्थानाची सुरक्षा व्यवस्था आणखी कडक केली. तर, एका पथकाने धमकीच्या फोनचा तपास सुरू केला. दहिसरमधून पोलिसांनी एकाला ताब्यात घेतले. पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या संशयिताचे नाव विष्णू भूमीक असल्याची माहिती सूत्रांनी दिली. संशयित आरोपी 57 वर्षीय असून मानसिक आजारी असल्याची माहिती सूत्रांनी दिली. आरोपी दहिसर पश्चिममधील एमएचबी पोलीस ठाण्याच्या हद्दीत वास्तव्यास आहे. स्थानिक पोलीस ठाण्यात याआधीदेखील आरोपीविरोधात गुन्हे दाखल आहेत. मुकेश अंबानी यांना जीवे मारण्याची धमकी देणाऱ्याने तीन तासात अंबानी कुटुंबीयांना ठार करणार असल्याची धमकी दिली. रिलायन्स फाउंडेशनच्या रुग्णालयाच्या क्रमांकावर हा धमकीचा फोन आला होता. फोन करणाऱ्या व्यक्तीने मुकेश अंबानी यांचे नाव घेऊन ही धमकी दिली. या फोननंतर रुग्णालयाच्या कर्मचाऱ्यांनी तातडीने डी.बी. मार्ग पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली.



सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, अंबानी यांना धमकी देणारे आठ फोन कॉल्स आले होते. या फोन कॉलची चौकशी सुरू करण्यात आली आहे. हे आठही फोन कॉल्स आजच आले. येत्या तीन तासात अंबानी कुटुंबीयांचा खात्मा करणार असल्याची धमकी या दरम्यान देण्यात आली. पोलिसांचे एक पथक रिलायन्स रुग्णालयात दाखल झाले आहे. या प्रकरणात कर्मचाऱ्यांचा जबाब नोंदवला जात असून अधिक माहिती घेतली जात आहे. रिलायन्स फाउंडेशन संचलित रुग्णालयाचे सीईओ डॉ. तरंग ज्ञानचंदानी यांनी बोलताना सांगितले की, आम्हाला आठ फोन कॉल आले होते. आम्ही या धमकी देणाऱ्या फोन कॉलला गांभीर्याने घेतले असल्याचे त्यांनी सांगितले. धमकीच्या फोन कॉलची माहिती पोलिसांना तात्काळ दिली असून रिलायन्सच्या सुरक्षा रक्षकांनाही याची माहिती देण्यात आली असल्याचे त्यांनी सांगितले.

'अँटिलिया'जवळ आढळली होती स्फोटकं असलेली कार मागील वर्षी फेब्रुवारी महिन्यात मुकेश अंबानी यांच्या 'अँटिलिया' निवासस्थानाबाहेर स्फोटकांनी भरलेली जीप आढळल्याने खळबळ उडाली होती. एका कारमध्ये जिलेटिनचा साठा सापडला होता. या स्फोटकांसह एक चिठ्ठीही सापडली असून त्यामधून घातपाताची धमकी देण्यात आली होती. मात्र, या धमकी प्रकरणात तत्कालीन पोलीस अधिकारी सचिन वाझे यांचा सहभाग असल्याचे आढळून आल्याने दहशतवादविरोधी पथकाने अटक केली. त्यानंतर या प्रकरणाचा तपास राष्ट्रीय तपाय यंत्रणेकडे (एनआयए) सोपवण्यात आला. अँटिलियाजवळ ज्या कारमध्ये स्फोटकं आढळली, ती कार ठाण्यातील व्यावसायिक मनसुख हिरेन यांची होती. स्फोटकं आढळल्याच्या घटनेनंतर त्यांचा मृतदेह आढळला. हिरेन यांच्या हत्येचा आरोप वाझे यांच्यावर आहे.

## अमरावतीत अकोला पोलिसांवर गोळीबार करणाऱ्या आरोपीला सिनेस्टाइल पकडले

अमरावती अकोला येथून पळून आलेल्या आरोपीचा पाठलाग करीत अमरावतीत पोचलेल्या अकोला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकावर आरोपीने गोळीबार केल्याची घटना लक्ष्मी नगर परिसरात घडली. या घटनेने अमरावती शहरात एकच खळबळ उडाली आहे. अखेर पोलिसांनी प्राणांची बाजी लावत आरोपीला सिनेस्टाइल अटक केली.



अशी आहे घटना अकोला स्थानिक पोलिसांना हवा असणारा आरोपी राजेश सुभाष राऊत हा अमरावतीत असल्याची माहिती मिळतात अकोल्याच्या स्थानिक गुन्हे शाखेचे पथक आज सकाळी लक्ष्मी नगर परिसरात पोहोचले. आपल्यासमोर पोलिस उभे ठाकल्याचे पाहून राजेश राऊत याने थेट जवळची बंदूक उचलून पोलिसांच्या वाहनाच्या समोरच्या चाकवर झाडली आणि त्यानंतर पळ काढला. दरम्याम पोलिस वाहनातून उतरून राजेशाच्या मागे धावले आणि मोठ्या शिताफीने त्याला पकडले. यानंतर त्याला गाडगेनगर पोलीस ठाण्यात आणण्यात आले. बुलडाणा पासून सुरू होता पाठलाग जुन्या अकोला शहरात गजानन नगर परिसरातील रहिवासी असणारा राजेश राऊत याच्यावर 25 ते 30 गुन्हे दाखल आहेत.अकोला पोलीस त्याचा अनेक दिवसांपासून शोध घेत होते. राजेश बुलडाण्यात असल्याची माहिती कळताच अकोल्याचे स्थानिक गुन्हे शाखेचे पथक बुलडाण्यात पोहोचले होते. पोलीस आल्याचे कळताच राजेश बुलडाण्यावरून अमरावतीला पळून आला. दरम्यान अकोला पोलिसांनी बुलडाण्यावरून अमरावतीपर्यंत त्याचा पाठलाग केला आणि आज त्याला ताब्यात घेतले.

## नगरसेविकेला बाहुली म्हणणे आले अंगलट; बीएमसीच्या अधिकाऱ्याला तीन महिन्यांचा तुरुंगवास

मुंबई : 40 वर्षीय नगरसेविकेला मोबाईलवर लज्जा निर्माण होईल असे संदेश पाठवल्याबद्दल एका बीएमसीच्या अधिकाऱ्याला दोषी ठरवून न्यायालयाने त्याला तीन महिन्यांच्या तुरुंगवासाची शिक्षा ठोठावली आहे. सोबतच पीडितेला तीन हजार रुपये देण्याचे आदेश देखील न्यायालयाच्या वतीने देण्यात आले आहेत. हे प्रकरण 2016 मधील आहे. पीडिता व तिच्या पतीने केलेल्या दाव्यानुसार 26 जानेवारी 2016 च्या रात्री साडेअकरा वाजता संबंधित महिलेच्या व्हॉट्सअॅपवर एका अनोळखी नंबरवरून अनेक संदेश आले. ज्यामध्ये तू जेवली का? झोपलीस का? तुझे लग्न झाले आहे का असे विविध प्रश्न विचारण्यात आले होते. तसेच आरोपीकडून काही अश्लील छायाचित्रेही पाठवण्यात आले होते. त्यानंतर या महिलेने घडलेला प्रकार आपल्या पतीला सांगितला. पतीने त्या नंबरवर कॉल करण्याचा प्रयत्न केला मात्र कॉलला प्रतिसाद मिळाला नाही. परत एक संदेश संबंधित महिलेच्या व्हॉट्सअॅपवर आला त्यामध्ये मला माफ करा रात्र असल्याने कॉल उचलू शकत नाही. ऑनलाईन या मला चॅट आवडते असा मजकूर होता. यानंतर संबंधित व्यक्तीविरोधात पोलिसात तक्रार दाखल करण्यात आली होती. न्यायालयाने काय म्हटले? या प्रकरणात न्यायालयाने आरोपीला तीन महिन्यांचा तुरुंगवास ठोठावला आहे. तसेच तीन हजार रुपये देण्याचे आदेश देखील दिले आहे. शिक्षा सुनावताना न्यायालयाने म्हटले आहे की, महिलांवरील अत्याचार वाढत आहेत. महिला घराबाहेर तसेच घरात देखील असुरक्षीत आहेत. अशा प्रकरणात आरोपीला शिक्षा झाल्यास तो इतर लोकांसाठी एक मोठा धडा असेल. अशा आरोपींना शिक्षेची आवश्यकता असल्याचंही न्यायालयाने म्हटले आहे. संबंधित व्यक्ती हा पीडितेला ओळखत नसताना देखील अशी छायाचित्रे पाठवणं किंवा तिच्याशी बोलण्याचा प्रयत्न करणं चुकीचं असल्याचे देखील न्यायालयाने म्हटले आहे.




## वेडसर महिलेवर सामूहिक अत्याचार! महिलेचं अपहरण करत आळीपाळीने संतापजनक कृत्य


अमरावती : एका वेडसर महिलेवर आळीपाळीने सामूहिक अत्याचार करण्यात आल्याची संतापजनक घटना समोर आलीय. याप्रकरणी पोलिसांत पीडित महिलेच्या आईने तक्रार दिली असून एकूण दोघा आरोपींना पोलिसांनी अटक केली आहे. अमरावती जिल्ह्यातील चिखलदरा पोलीस ठाण्याच्या हद्दीत ही संतापजनक घटना घडली आहे. लिफ्ट मागितलेल्या या महिलेला गाडीत बसवून पळवून नेण्यात आलं आणि त्यानंतर आळीपाळीने या महिलेवर अत्याचार करण्यात आला, असा आरोप करण्यात आला आहे. ही धक्कादायक घटना 12 ऑगस्ट रोजी दुपारी 12 वाजता घडली. पीडित महिलेच्या आईने केलेल्या तक्रारीवरुन पोलिसांनी गंभीर दखल घेत एकूण दोघा आरोपींना अटक केली आहे. ही घटना उघडकीस आल्यानंतर संपूर्ण अमरावती जिल्ह्यात खळबळ माजलीय. सेमाडोह इथं ही महिला मुख्य चौकात उभी होती. पीडित महिला वेडसर असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. या वेडसर महिलेला सुनील मनोहर दहीकर आणि सुखराम नानकराम धांडे यांनी आपल्या बाईकवर बसवलं आणि तिला जंगलात घेऊन गेले. त्यानंतर तिच्यावर सामूहिक बलात्कार केला. आळीपाळीने या दोघांनी वेडसर महिलेवर 12 ऑगस्ट रोजी दुपारी जंगलात बलात्कार केला. पिली गावाजवळ असलेल्या जंगलात नराधमांनी हे संतापजनक कृत्य केलं असल्याचं समोर आलंय.पीडित महिला ही 20 वर्षांची तरुणी असून या वेडसर महिलेचे लग्नही झाले होते. काही दिवसांपूर्वी पती-पत्नीचं पटत नसल्यानं तिच्या पतीने तिला माहेरी आणून सोडलं होतं. धामी तालुक्यात या पीडितेला लग्न करुन सासरी पाठवण्यात आलं होतं. पण लग्नानंतर झालेल्या वादामुळे पतीने या पीडितेला तिच्या काकाकडे आणून सोडलं होतं. शुक्रवारी रात्री सेमाडोह येथील चौकात ही महिला उभी असताना दोघा नराधमांनी येऊन तिच्यावर अतिप्रसंग केला.




## अकोल्यात वर्चस्वाच्या लढाईतून एकाची हत्या, मारेकरीही जखमी

अकोला : वर्चस्वाच्या वादातून अकोल्यात एकाची हत्या करण्यात आली आहे. या घटनेत मारोकरी आरोपीही जखमी झाला आहे. अकोला शहरातील न्यू तापडिया नगरमध्ये वर्चस्वाच्या वादातून चाकूने वार करत हे हत्याकांड घडले आहे. ही घटना शनिवारी रात्री 10 वाजताच्या सुमारास घडली. या प्रकरणात सिव्हिल पोलीस पुढील तपास करीत आहे. विनोद वामन ठोबरे असं या मृतक तीस वर्षीय युवकाचं नाव आहे. तो शहरालगतच्या खरप गावातील पंचशील नगरचा रहिवाशी आहे.

विनोद वामन ठोंबरे याच्यावर शनिवारी रात्री 10 वाजता हल्ला करुन हत्या करण्यात आली. तर हल्ला करणारा मारेकरी सुहास वाकोडे हा देखील जखमी झाला असून त्याच्यावर शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत. लवकरच पोलीस त्याला ताब्यात घेणार आहेत. अनेक दिवसांपासून मृतक विनोद आणि मारेकऱ्यांमध्ये वर्चस्वाची लढाई सुरु होती, आज या लढाईचं रूपांतर हत्येमध्ये झालं. सुहासने विनोदच्या छातीवर आणि अंगावर चाकूने वार करीत त्याला गंभीर जखमी केले, त्यात त्याचा मृत्यु झाला. अकोला शहरातील सिव्हिल पोलीस स्टेशन हद्दीत येणाऱ्या न्यू तापडिया नगरातील गणेश मंदिर जवळ हे हत्याकांड घडले. दरम्यान, या घटनेची माहिती मिळताच सिव्हिल लाइन पोलिसांसह वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेटी दिल्या.



## पाच हजारांची लाच घेताना पोलीस हवालदाराला रंगेहात अटक

पुणे : पाच हजारांची लाच घेताना एका पोलीस हवालदाराला रंगेहात अटक करण्यात आली आहे. महाराष्ट्र लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे ही कारवाई करण्यात आली आहे. याप्रकरणी एका 48 वर्षीय पोलीस हवालदाराला शनिवारी पुण्यात रंगेहात पकडण्यात आले. एका व्यक्तीकडून ज्याच्या विरोधात पोलिसांनी (Pune police) प्रतिबंधात्मक कायदेशीर कारवाई सुरू केली होती, त्यालाच 'चॅप्टर प्रोसिडिंग'ही म्हटले जाते, अशा व्यक्तीकडून त्याने 5,000 रुपयांची लाच घेतली. पोलिसांनी अटक केलेल्या कॉन्स्टेबलची ओळख विजय शिंदे अशी केली असून तो पुणे शहर पोलिसांतर्गत कोथरूड विभागाच्या सहायक पोलीस आयुक्त कार्यालयात तैनात आहे. लाचप्रकरणी पोलिसांनी त्याला अटक केली आहे. दरम्यान, त्याला रविवारी न्यायालयात हजर केले जाणार असल्याचे पोलिसांनी सांगितले.



पोलीस त्या व्यक्तीविरुद्ध करू शकतात कारवाई

शिंदे यांनी आपल्याविरुद्ध सुरू केलेल्या प्रकरणाच्या कारवाईसंदर्भात लाच मागितल्याचा आरोप तक्रारदाराने केला होता. तसेच या तक्रारदाराने यापूर्वी एसीबीच्या पुणे युनिटशी संपर्क साधला होता. तक्रार प्राप्त झाल्यानंतर, ACP कार्यालयाच्या परिसरात सापळा रचण्यात आला आणि शिंदेला रंगेहाथ पकडून अटक करण्यात आली, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, फौजदारी प्रक्रिया संहितेनुसार, जर ती व्यक्ती बेकायदेशीर कृत्यांमध्ये सामील होण्याची किंवा कोणत्याही प्रकारे शांतता बिघडवण्याची शक्यता आहे असे मानण्याचे कारण त्यांच्याकडे असल्यास पोलीस काही व्यक्तींविरुद्ध अशी कारवाई करू शकतात.

दंडात्मक कारवाई

पुढे पोलीस अधिकाऱ्याने सांगितले, की प्रकरणाच्या कार्यवाही अंतर्गत पोलीस अशा व्यक्तींना नोटीस बजावतात आणि त्यांना चेतावणी देतात, की अशा कोणत्याही कृतीत सामील झाल्यास दंड किंवा अटकसह दंडात्मक कारवाई केली जाईल. कार्यवाहीचा एक भाग म्हणून, त्या व्यक्तीला ACP दर्जाच्या अधिकाऱ्यासमोर उपस्थित राहण्यास सांगितले जाते. या प्रकरणाचा तपास करणारे एसीबीचे निरीक्षक प्रवीण निंबाळकर यांनी सांगितले, की कॉन्स्टेबल शिंदेला रविवारी न्यायालयात हजर केले जाईल. दरम्यान, कोणीही लाच मागण्याचा प्रयत्न केल्यास लाचलुचपत विभागाशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.


हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. 4, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. 2, गोरेगांव (पूर्व), मुंबई - 400 063 येथे छापून 2, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - 401 105 येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत). संपर्कः-9594418181 / 8424989898